दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १५८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

सोमवार दि. २ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, चतुर्दशी संध्याकाळी ५-५६ पर्यंत दिवस नक्षत्र- आश्लेषा सकाळी ७-५२ पर्यंत नंतर मघा
योग- अतिगंड दुपारी १२-१९ पर्यंत नंतर सुकर्मा
चंद्र रास-सकाळी ७-५२ पर्यंत कर्क नंतर सिंह

### फळे, फुलबाजार उद्या बंद

**पुणे**: मंगळवारी (दि.३) धुलिवंदन आहे. त्यामुळे या दिवशी दरवर्षीप्रमाणे पुणे बाजार समितीचा मुख्य बाजार असलेल्या मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला, फुल, पान, केळी आणि मोशी उपबाजार बंद राहणार आहे. याबाबतचे पत्रक सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांच्या सहीने काढण्यात आले आहे. तरी शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीस आणू नये, तसेच, व्यापाऱ्यांनी खरेदीस आणू नये, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाच्य वतीने करण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### काश्मीरमध्ये शाळा, महाविद्यालये बंद

**श्रीनगर :** अमेरिका-इस्रायल संयुक्त हल्ल्यात इराणी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येविरोधात खोऱ्यात निदर्शने सुरू असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून काश्मीरमधील शाळा आणि महाविद्यालये सोमवारपासून दोन दिवस बंद राहतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. खमेनी यांच्या हत्येविरोधात रविवारी श्रीनगर शहरासह काश्मीरच्या अनेक भागात हजारो निदर्शक रस्त्यावर उतरले.

### सायबर फसवणूक; २७ जणांना अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी आठवडाभर चाललेल्या संपूर्ण भारतभराच्या मोहिमेनंतर ११ राज्यांमधून १.५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये २७ जणांना अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी १.५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या किमान १० मोठ्या सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये सहभाग घेतला होता, तर त्यांच्या संशयित बँक खात्यांची तपासणी केली असता १३.९१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार आढळून आले.

### इराणवरील हल्ल्यांचा ओवैसींकडून निषेध

**हैदराबाद :** अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांचा निषेध करताना, एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी रविवारी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांची "हत्या" ही "अनैतिक आणि बेकायदेशीर कृत्य" असल्याचे म्हटले. हैदराबादच्या खासदाराने सांगितले की, प्रादेशिक अस्थिरता रोखण्यासाठी इराणवरील हल्ले त्वरित थांबवले पाहिजेत, कारण या प्रदेशात १ कोटी भारतीय काम करतात.

### इराणचे प्रत्युत्तर, जागतिक अर्थव्यवस्था आणि विमान वाहतुकीवर परिणाम

# मध्य पूर्वेतील तणाव धोकादायक टप्प्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील वाढत्या संघर्षाने आता गंभीर वळण घेतले असून अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांना इराणने जोरदार प्रत्युत्तर दिल्याने परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. या संघर्षाचा परिणाम भारतासह जागतिक अर्थव्यवस्था, विमान वाहतूक आणि तेल बाजारावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेच्या पाठिंब्याने इस्रायलने इराणमधील सुमारे ३० ठिकाणांवर लक्ष्यित हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईत अनेक लष्करी तळांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. आतापर्यंत झालेल्या हल्ल्यांमध्ये सुमारे २०० इराणी नागरिकांचा मृत्यू झाला असून ८०० हून अधिक नागरिक जखमी झाल्याचे वृत्त आहे.



या संघर्षाचा तात्काळ परिणाम जागतिक विमान वाहतुकीवर दिसून आला आहे. मध्यपूर्वेतील हवाई हद्द अचानक बंद करण्यात आल्यामुळे जगभरातील हजारो विमान उड्डाणांवर परिणाम झाला असून अनेक उड्डाणे रद्द किंवा वळवावी लागली आहेत. फ्लाइट ट्रॅकिंग संकेतस्थळांच्या माहितीनुसार अनेक विमाने पर्यायी मार्ग शोधताना हवेतच घिरट्या घालताना दिसली. दिल्लीहून तेल अवीवकडे जाणारे एअर इंडियाचे विमान मध्यमार्गातून मुंबईला परतावे लागल्याची माहिती समोर आली आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने भारतीय विमान कंपन्यांना ११ देशांच्या हवाई हद्दीतून उड्डाण टाळण्याचा सल्ला दिला आहे. त्यामध्ये इराण, इस्रायल, लेबनॉन, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, बहरीन, ओमान, इराक, जॉर्डन, कुवेत आणि कतार या देशांचा समावेश आहे. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नवीन आदेश न आल्यास हा सल्ला २ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. त्यानुसार एअर इंडिया, इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, अकासा एअर आणि स्पाइसजेट यांनी मध्यपूर्वेतील काही उड्डाणे रद्द किंवा तात्पुरती स्थगित केली आहेत.

दरम्यान, इराण हा प्रमुख तेल उत्पादक देश असल्याने संघर्ष तीव्र झाल्यास जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्यास भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. परिणामी पेट्रोल-डिझेल दरवाढ, महागाईत वाढ आणि उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता वाढत असून गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीकडे वळत आहेत. त्यामुळे सोने आणि चांदीच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संघर्ष अधिक चिघळल्यास येत्या काही आठवड्यांत जागतिक शेअर बाजारात मोठी अस्थिरता दिसून येऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# अयातुल्लाह अलिरेझा अराफी अंतरिम सर्वोच्च नेते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर देशात घटनात्मक प्रक्रियेनुसार तात्पुरती नेतृत्व व्यवस्था लागू करण्यात आली असून वरिष्ठ धर्मगुरू अयातुल्लाह अलिरेझा अराफी यांची अंतरिम सर्वोच्च नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि मुख्य न्यायाधीश गुलाम-होसेन मोहसेनी-एजेई यांच्या सहभागासह स्थापन करण्यात आलेली अंतरिम नेतृत्व परिषद नव्या सर्वोच्च नेत्याची निवड होईपर्यंत देशाचे प्रशासन सांभाळणार आहे. देशात स्थैर्य राखण्याचे मोठे आव्हान या परिषदेसमोर उभे राहिले आहे.

अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हवाई हल्ल्यात खामेनी यांचा मृत्यू झाल्याची पुष्टी इराणच्या सरकारी माध्यमांनी केली आहे. या घटनेनंतर इराणमध्ये ४० दिवसांचा राष्ट्रीय शोक आणि सात दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शनिवारी झालेल्या हल्ल्यांमध्ये तेहरानमधील महत्त्वाच्या लष्करी आणि प्रशासकीय ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

१९८९ पासून सर्वोच्च नेते पदावर असलेल्या ८६ वर्षीय खामेनी यांच्या निधनानंतर इराणच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वासमोर आता नव्या नेतृत्वाची निवड आणि देशातील अंतर्गत स्थैर्य टिकवण्याचे दुहेरी आव्हान उभे राहिले आहे.

इराणने या हल्ल्याला प्रत्युत्तर देत इस्रायल तसेच अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरू केले आहेत. त्यामुळे मध्य पूर्वेतील तणाव आणखी वाढला असून व्यापक संघर्षाची शक्यता व्यक्त केली जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कारवाईचे समर्थन केले आहे.

# महाराष्ट्रातून खंडग्रास तर अरुणाचल प्रदेशातून खग्रास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** यावर्षी जगभरात दोन सूर्यग्रहण आणि दोन चंद्रग्रहण दिसणार असले तरी भारतातून ३ मार्च २०२६ रोजी केवळ एकच चंद्रग्रहण पाहता येणार आहे. चंद्र उगवल्यानंतर भारतातील विविध भागांत हे ग्रहण वेगवेगळ्या स्वरूपात दिसणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली आहे.

भारतात चंद्र क्षितिजाखाली असतानाच दुपारी ३.२० वाजता खंडग्रास ग्रहणाला सुरुवात होईल. सायंकाळी ४.३४ वाजता खग्रास अवस्थेला सुरुवात होऊन ५.३२ वाजता ग्रहण समाप्त होईल. मात्र भारतातून पूर्ण खग्रास चंद्रग्रहण केवळ अरुणाचल प्रदेशातूनच दिसणार आहे. देशातील इतर भागांत ग्रहण अंशतः दिसणार आहे. कोलकाता येथे सुमारे ९० टक्के ग्रहण दिसेल, गडचिरोली येथे ३० टक्के, तर चंद्रपूर आणि नागपूर येथे चंद्र उगवताना सुमारे २५ टक्के खंडग्रास अवस्था पाहता येईल. पुण्यात सुमारे १० टक्के आणि मुंबईत चंद्र उंचीवर आल्यानंतर केवळ १ टक्का ग्रहण दिसण्याची शक्यता आहे. विदर्भात संध्याकाळी ६.१८ ते ७.३३ या वेळेत अल्प स्वरूपात ग्रहण निरीक्षण करता येईल. हे चंद्रग्रहण पाकिस्तान, अफगाणिस्तान, भारतासह आशिया, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील काही भागांतूनही दिसणार आहे.

यापूर्वी १७ फेब्रुवारी रोजी जगातील काही भागांत कंकणाकृती सूर्यग्रहण दिसले होते. १२ ऑगस्ट रोजी खग्रास सूर्यग्रहण आणि २८ ऑगस्ट रोजी खंडग्रास चंद्रग्रहण होणार आहे. महाराष्ट्रातून हे ग्रहण सुमारे १ तास ३५ मिनिटेच अल्प स्वरूपात दिसेल. उंच ठिकाणावरून निरीक्षण केल्यास ग्रहण अधिक स्पष्ट दिसू शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### पूर्वेतील युद्धामुळे उड्डाणे रद्द, केंद्र सरकारकडून हालचाली सुरू

# युद्धामुळे पुण्यातील ८४ विद्यार्थी दुबईत अडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाची झळ आता आखाती देशांपर्यंत पोहोचली असून त्याचा फटका परदेशात प्रवास करणाऱ्या भारतीयांनाही बसू लागला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरातील अनेक विमान उड्डाणे रद्द करण्यात आल्याने पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी दुबईत अडकून पडल्याची घटना समोर आली आहे.

पुण्यातील इंदिरा महाविद्यालयाचे सुमारे ८० विद्यार्थी आणि ४ शिक्षक शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी दुबई येथे गेले होते. मात्र मध्य पूर्वेतील तणाव वाढल्यानंतर हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आणि उड्डाणे रद्द झाल्याने हे सर्वजण तेथेच अडकले आहेत. एकूण ८४ जण दुबईत अडकल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली आहे.



अडकलेल्या विद्यार्थ्यांनी तेथील परिस्थिती दर्शवणारे काही धक्कादायक व्हिडीओही शेअर केले असून सुरक्षितपणे भारतात परत आणण्यासाठी केंद्र सरकारकडे मदतीची विनंती केली आहे. युद्धामुळे आखाती देशांतील वातावरण तणावपूर्ण झाले असून विमानसेवेतील मोठ्या व्यत्ययाचा परिणाम प्रवाशांवर होत आहे.

घटनेची माहिती मिळताच महाविद्यालय प्रशासन तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सर्व विद्यार्थी आणि शिक्षक सुरक्षित असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालय विद्यार्थ्यांच्या सतत संपर्कात असून त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी आवश्यक हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

महाविद्यालय प्रशासनाने सांगितले की, सर्व ८४ जण सुरक्षित असून त्यांना लवकरात लवकर भारतात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पालकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. संबंधित शासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून असून उड्डाण सेवा पूर्ववत होताच विद्यार्थ्यांच्या परतीची व्यवस्था करण्यात येणार आहे.

दरम्यान, इस्रायल-इराण संघर्ष तीव्र झाल्यानंतर आखाती प्रदेशातील अनेक विमानतळांवरील उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अमेरिकेच्या तळांवर झालेल्या हल्ल्यांनंतर दुबईसह काही भागांतील सुरक्षा सतर्कता वाढवण्यात आली असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.

# कोंढवा-येवलेवाडीला मेट्रोची शक्यता
## शिवाजीनगर ते येवलेवाडी २० किमी उन्नत मार्गिका प्रस्तावित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** दक्षिण पुण्यातील कोंढवा आणि येवलेवाडी परिसरातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारी मेट्रो सेवा लवकरच प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवाजीनगर ते येवलेवाडी असा मेट्रो मार्ग विस्तारण्याचा प्रस्ताव सध्या पुढे आला असून सर्व मंजुरी आणि सर्वेक्षण प्रक्रिया वेळेत पूर्ण झाल्यास २०३०-३१ पर्यंत ही मार्गिका सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर ते येवलेवाडी दरम्यान सुमारे २० किमी लांबीची उन्नत मेट्रो मार्गिका उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. हा विस्तार हिंजवडी ते शिवाजीनगर या २३ किमी लांब मेट्रो प्रकल्पाच्या पुढील टप्प्याचा भाग असणार आहे.

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर उभारली जात असली तरी कोंढवा ते येवलेवाडी हा विस्तार महामेट्रोकडून थेट राबवला जाणार आहे. प्रस्तावित मार्ग शिवाजीनगरपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जाऊन पुढे कॅम्प आणि पुलगेट मार्गे कोंढवा व येवलेवाडीकडे नेण्यात येणार आहे. याशिवाय ज्योती चौक ते एनआयबीएम जंक्शन आणि पुढे बिशप विद्यालयाजवळून उंड्रीपर्यंत अतिरिक्त स्पर लाईन विकसित करण्याचाही प्रस्ताव आहे. या संपूर्ण मार्गावर साधारणपणे प्रत्येक १ किमी अंतरावर मेट्रो स्थानके उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महामेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती दोन महिन्यांपूर्वी करण्यात आली असून क्षेत्र सर्वेक्षण सुरू आहे. मे-जूनपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल सादर होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर राज्य सरकारची मंजुरी घेऊन प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. पावसाळी अधिवेशनात आमदार योगेश टिळेकर यांनी कोंढवा-येवलेवाडी मेट्रो मार्गाची मागणी केली होती.

### ग्रामस्थांचा कला केंद्रात राडा

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील थापटी तांडा येथील कुलस्वामिनी कला केंद्रात शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास मोठा राडा झाला. एका किरकोळ वादाचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले असून, संतापलेल्या सुमारे ३०० ग्रामस्थांच्या जमावाने कला केंद्रावर चाल करून मोठी तोडफोड केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला. दरम्यान या घटनेनंतर पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हे कला केंद्र अनधिकृत असून ते तातडीने बंद व्हावे, अशी मागणी आडूळ परिसरातील सुमारे २० गावांतील ग्रामस्थांनी वारंवार केली होती.

# राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार उभे करा
### अमित शाह यांच्या थेट सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत, सर्वाधिक तीन ते चार जागा जिंकण्याइतके आमदार संख्याबळ असलेल्या भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या व्यतिरिक्त आश्चर्याचा धक्का देणारी नावे जाहीर होऊ शकतात. यात एका अमराठी नेत्याच्या नावाचीही चर्चा आहे.

विरोधकांच्या महाविकास आघाडीत उमेदवारीवरून झालेले वाद पाहता, पहिल्या टप्प्यात सहा जागांवर विजयाची खात्री असलेली सत्ताधारी महायुती ऐन वेळी सातव्या जागेसाठीही उमेदवार उतरवण्याची शक्यता आहे. राज्यसभेसाठी भाजपकडून चार उमेदवारांची नावे ठरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी राज्य सुकाणू समितीची नुकतीच बैठक झाली. त्यात निश्चित झालेल्या नावांबाबत भाजपाध्यक्ष नितीन नवीन यांच्याशी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्यातील नेते चर्चा करण्याची शक्यता आहे.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचीही नावे चर्चेत आहेत. राज्यसभेच्या सात जागांपैकी भाजप चार, राष्ट्रवादी काँग्रेस एक व शिवसेना एक असे सूत्र महायुतीत निश्चित झाले आहे. सातव्या जागेसाठी मविआमधील वाद कायम असताना, या जागेवरही उमेदवार उतरविण्याची सूचना गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून आल्याचे समजते. भाजपला सातवा उमेदवार निवडून आणायचा असेल, तर २० मते अतिरिक्त आणावी लागतील व ते साध्य करण्याची तयारी महायुतीने केल्याचे समजते.

**मविआत दुफळी?**

महाविकास आघाडीचा एक उमेदवार जिंकायचा असेल, तर तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन एक उमेदवार देण्याचा पर्याय प्रत्यक्षात येण्याची चिन्हे नसल्याचे भाजप सूत्रांना वाटते. काँग्रेस आणि उबाठा शिवसेना पक्ष हे दोन पक्ष एकत्र आले, तरी त्यांच्याकडे काठावरच्या बहुमतासाठीची ३६ मते होतात.

### सर्व कार्यालयांची तपासणी; अहवाल सादर करणे बंधनकारक

# राज्यभरात ३० दिवसांत 'पॉश' कायद्याचे विशेष ऑडिट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यभरातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खासगी कार्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासाठी लागू असलेल्या 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' अर्थात पॉश कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे की नाही, याची पडताळणी करण्यासाठी ३० दिवसांत विशेष ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी




सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट निर्देश जारी केले आहेत.

राज्यातील प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती (अंतर्गत समिती – आयसी) कार्यरत आहे का, तिची रचना कायद्याप्रमाणे करण्यात आली आहे का आणि समिती प्रत्यक्षात काम करत आहे का, याची खात्री करण्यासाठी हे 'पॉश ऑडिट' राबवले जाणार आहे. ज्या कार्यालयांमध्ये समिती अस्तित्वात नाही, त्यांनी तात्काळ स्थापना करावी, अन्यथा संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार सर्व शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, मंडळे, स्वायत्त संस्था तसेच खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. याशिवाय जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती (स्थानिक समिती – एलसी) कार्यरत असणे आवश्यक आहे.

राज्य महिला आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, विविध अहवाल तसेच राज्यभरातील दौऱ्यांदरम्यान अनेक गंभीर त्रुटी आढळल्याचे रूपाली चाकणकर यांनी नमूद केले. काही कार्यालयांत समिती स्थापनच नसल्याचे, तर काही ठिकाणी समिती केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात निष्क्रिय असल्याचे समोर आले आहे. समिती सदस्यांना प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल सादर न करणे तसेच कार्यालयात माहिती फलक न लावणे यांसारख्या बाबीही निदर्शनास आल्या आहेत.

ऑडिट प्रक्रियेदरम्यान प्रत्येक कार्यालयाकडून सविस्तर अंतर्गत समिती ऑडिट अहवाल तयार करण्यात येणार आहे. या अहवालात समितीची रचना, स्थापनेचा आदेश, प्राप्त व प्रलंबित तक्रारी, त्यावर झालेली कार्यवाही, निकालांची अंमलबजावणी, वार्षिक अहवाल, जनजागृती उपक्रम आणि कार्यालय परिसरातील माहिती फलक यांचा समावेश असणार आहे. समिती अपूर्ण किंवा अस्तित्वात नसल्यास तातडीने स्थापना करण्याचे आदेश देण्यात आले असून, कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी हे परीक्षण पूर्ण करून ३० दिवसांच्या आत अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकान्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** केंद्र सरकारकडून होणाऱ्या आगामी जनगणनेत इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याच्या निषेधार्थ रविवारी (१ मार्च) नागपूरच्या संविधान चौकात ओबीसी समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे विधानसभेतील विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि समाजबांधव सहभागी झाले.

जनगणनेच्या अर्जात ओबीसींचा स्वतंत्र उल्लेख नसल्यास समाजाचे हक्क आणि प्रतिनिधित्व धोक्यात येईल, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणावरही याचा परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली. स्वतंत्र रकाना समाविष्ट होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. विजय वडेट्टीवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका करत, स्वतःला ओबीसींचे समर्थक म्हणवणारे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री या मुद्द्यावर मौन का बाळगून आहेत, असा सवाल उपस्थित केला.

सरकारने मागणी मान्य केली नाही, तर आंदोलन गावपातळीवर नेऊन असहकार आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. जनगणनेच्या अर्जात ओबीसी रकाना नसल्यास समाजातील नागरिक जनगणनेत सहभागी होणार नाहीत आणि घरासमोर निषेधाचे फलक लावले जातील, अशी भूमिकाही आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केली.

# महामार्गावरील कोंडी आणि व्यवस्थेची अडचण

**» मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टँकर अपघातामुळे ३६ तास ठप्प झालेली वाहतूक ही केवळ दुर्घटना नव्हती; ती व्यवस्थेच्या तयारीचा अभाव उघड करणारी घटना होती. आधुनिक पायाभूत सुविधा उभारणे आणि त्यांचे सुज्ञ व्यवस्थापन करणे यातला फरक राज्याला नव्याने समजण्याची ही वेळ आहे.**



द्रुतगती महामार्ग हे आधुनिकतेचे प्रतीक मानले जातात; पण आधुनिकता केवळ रस्त्याच्या काँक्रीटमध्ये नसते, ती व्यवस्थापनाच्या शिस्तीत असते. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ज्वलनशील प्रोपिलिन वायू वाहून नेणारा टँकर पलटी झाल्यानंतर निर्माण झालेली ३६ तासांची वाहतूक कोंडी ही एका अपघाताची कथा कमी आणि प्रणालीगत अपयशाची कहाणी अधिक ठरते. दुर्घटना अचानक घडतात; परंतु त्यानंतर निर्माण होणारा गोंधळ हा नियोजनाच्या अभावातूनच जन्माला येतो. राज्यातील सर्वात महत्त्वाच्या आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत मानल्या जाणाऱ्या महामार्गावर अशी परिस्थिती निर्माण झाली, ही बाब स्वतःमध्येच चिंताजनक आहे. कारण हा मार्ग केवळ दोन शहरांना जोडणारा नाही; तो महाराष्ट्राच्या आर्थिक रक्ताभिसरणाचा मुख्य धागा आहे. अशा मार्गावर ३६ तास वाहतूक बंद राहणे म्हणजे केवळ प्रवाशांची गैरसोय नव्हे, तर आर्थिक क्रियाकलापांवर थेट परिणाम होणे होय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिलेली माहिती, अपघाताच्या वेळी वाहनधारकांना एसएमएसद्वारे त्वरित सूचना देणारी यंत्रणा विकसित करण्याचे आदेश, ही योग्य दिशेची पावले म्हणावी लागतील. परंतु प्रश्न असा आहे की अशी कल्पना आज सुचावी का? डिजिटल युगात वाहतूक व्यवस्थापनाचे मूलभूत साधन म्हणून 'रिअल-टाइम माहिती' ही संकल्पना अनेक देशांत दशकापूर्वी रुजली आहे. आपल्याकडे मात्र प्रत्येक संकटानंतरच सुधारणा आठवतात. या घटनेतून उघड झालेले सर्वात गंभीर वास्तव म्हणजे ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या कंपन्यांकडे आपत्कालीन व्यवस्थेचा अभाव. धोकादायक रसायनांची वाहतूक ही केवळ व्यावसायिक क्रिया नसून सार्वजनिक सुरक्षेशी निगडित जबाबदारी असते. वाहन परवाना आणि विमा यापलीकडे जाऊन संकट व्यवस्थापनाची क्षमता अनिवार्य असावी लागते. अन्यथा महामार्ग हे केवळ वेगाचे नव्हे, तर संभाव्य आपत्तीचे मार्ग ठरतात.

सरकारने आदर्श कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे आदेश दिले आहेत, ही स्वागतार्ह बाब. मात्र भारतीय प्रशासकीय व्यवस्थेची समस्या आदेशात नसून अंमलबजावणीत असते. अनेक नियम कागदावर परिपूर्ण असतात; प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी अपुरी राहते. आपत्कालीन बचाव पथके, विशेष उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचारी यांची उपलब्धता ही घोषणांपेक्षा महत्त्वाची ठरते. या घटनेने आणखी एक विसंगती स्पष्ट केली. अत्याधुनिक 'इंटेलिजंट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टम' अस्तित्वात असूनही माहिती नागरिकांपर्यंत वेळेवर पोहोचली नाही. तंत्रज्ञान बसवणे आणि ते परिणामकारक वापरणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेकदा पायाभूत सुविधा उभारणीला प्राधान्य दिले जाते; पण संचालन व्यवस्थेतील कौशल्य दुर्लक्षित राहते. परिणामी, प्रणाली असते; पण उपयोग होत नाही. ३६ तासांत वसूल झालेला पाच कोटी रुपयांचा पथकर परत देण्याचा निर्णय हा प्रतीकात्मक दिलासा असला तरी मूळ प्रश्न वेगळाच आहे. प्रवाशांचा वेळ, इंधनाचा अपव्यय, मालवाहतुकीतील विलंब आणि आर्थिक नुकसान यांची भरपाई कोण करणार? आधुनिक अर्थव्यवस्थेत 'वेळ' हीच सर्वात महाग संपत्ती असते. वाहतूक व्यवस्थेतील अकार्यक्षमता ही अप्रत्यक्ष आर्थिक करासारखीच ठरते. प्रगत देशांतील आपत्कालीन व्यवस्थांचा अभ्यास करण्यासाठी समित्या नेमणे ही परिचित प्रतिक्रिया आहे. परंतु अभ्यासापेक्षा सातत्यपूर्ण सराव अधिक आवश्यक असतो. आपत्ती व्यवस्थापन हे दस्तऐवजांमधून नव्हे, तर नियमित प्रशिक्षण आणि समन्वयातून विकसित होते. पोलीस, अग्निशमन, आरोग्य यंत्रणा, महामार्ग प्राधिकरण आणि खासगी वाहतूक कंपन्या यांच्यातील समन्वय हीच खरी कसोटी ठरते. या घटनेतून सर्वात महत्त्वाचा धडा असा की पायाभूत सुविधा उभारणे ही विकासाची पहिली पायरी आहे; पण त्यांचे व्यवस्थापन ही खरी प्रगल्भता आहे. भारतात रस्ते वेगाने बांधले जात आहेत, पण त्याच वेगाने व्यवस्थापन क्षमता विकसित होत आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा राज्याच्या अभिमानाचा प्रकल्प मानला जातो. परंतु अभिमान टिकवण्यासाठी केवळ विस्तार नव्हे, तर सुरक्षितता, तत्पर माहिती व्यवस्था आणि संकटप्रतिकारक प्रशासन आवश्यक असते. अन्यथा प्रत्येक अपघातानंतर नवी समिती आणि नवे आश्वासन हा चक्राकार क्रम सुरूच राहील. दुर्घटना टाळता येत नाहीत; पण अराजकता टाळता येते. शासनाने आता घेतलेले निर्णय जर प्रत्यक्षात उतरले, तर ही घटना धडा ठरेल. अन्यथा तीही आपल्या प्रशासकीय स्मृतीत आणखी एका 'शिकवण' म्हणून जमा होईल, पुढील अपघातापर्यंत.

## संपादकीय

### युद्धाचे उद्दिष्ट आणि जगाचा अस्थिर क्षण



**इराणवरील संयुक्त लष्करी हल्ल्यांनी पश्चिम आशियातील संघर्षाला नवे वळण दिले आहे. युद्धाचा उद्देश जर राजवट बदल ठरला, तर संघर्षाची मर्यादा संपते. या घडामोडी ऊर्जा बाजार, जागतिक राजकारण आणि भारताच्या हितसंबंधांसाठी गंभीर संकेत देणाऱ्या ठरत आहेत.**

युद्धे कशी सुरू होतात यापेक्षा ती कशासाठी लढली जातात हा प्रश्न अधिक महत्त्वाचा असतो. इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यांनंतर हा प्रश्न पुन्हा मध्यवर्ती ठरला आहे. कारण या कारवाईचा स्वर केवळ लष्करी प्रतिबंधाचा नसून तेहरानमधील सत्ताकेंद्र कमकुवत करण्याचा किंबहुना राजवट बदलाचा असल्याचे स्पष्ट संकेत दिले गेले आहेत. यानंतर संघर्षाची गणिते मूलभूतपणे बदलतात. मर्यादित उद्दिष्ट असलेल्या युद्धांना शेवट असतो; अस्तित्वाशी निगडित युद्धांना नसतो. एखाद्या राज्याला स्वतःचे अस्तित्व धोक्यात असल्याची जाणीव झाली की त्याच्या प्रतिक्रियांवर पारंपरिक तर्क लागू राहत नाही. अशा वेळी संयम हा पर्याय नसतो; प्रतिकार हीच नीती ठरते. त्यामुळेच सध्याची परिस्थिती अधिक धोकादायक आहे. या संकटातील सर्वाधिक दुर्लक्षित पण निर्णायक घटक म्हणजे वेळेची निवड. आण्विक वाटाघाटी पुन्हा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर हल्ले झाले. यामुळे इराणमध्ये एक राजकीय निष्कर्ष दृढ होतो. राजनैतिक संवाद सुरक्षा देत नाही. चर्चेच्या टेबलावर बसणे म्हणजे स्वतःला लक्ष्य बनवणे. अशा परिस्थितीत भविष्यातील कोणतीही अणुसंयम प्रक्रिया इराणच्या अंतर्गत राजकारणात संशयास्पद ठरणे अपरिहार्य आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांचा पाया करारांपेक्षा विश्वासावर उभा असतो. तो एकदा तुटला की तपासण्या, निर्बंध किंवा सामंजस्य करार केवळ कागदावर उरतात. सध्या दिसणारा सर्वात मोठा धोका म्हणजे संवादाच्या जागी सूडाचे चक्र सुरू होणे. राजनैतिक हस्तक्षेप जितका उशिरा, तितकी त्याची किंमत अधिक. या संघर्षाचा तात्काळ आर्थिक केंद्रबिंदू म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. जागतिक तेलपुरवठ्याचा मोठा हिस्सा या अरुंद जलमार्गातून जातो. युद्धाची औपचारिक घोषणा न होता देखील येथे निर्माण होणारा तणाव पुरेसा असतो. विमा दर वाढतात, जहाजांचे मार्ग बदलतात आणि ऊर्जा बाजार अस्थिर होतात. तेलाच्या किंमतींची वाढ ही केवळ ऊर्जा समस्या नसून व्यापक आर्थिक संकटाची सुरुवात ठरते. भारतासाठी हा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेला तेलदरवाढ म्हणजे दुहेरी धक्का. महागाई आणि व्यापार तूट. रुपयावरील दबाव वाढतो, वित्तीय शिस्त ढासळते आणि विकासदरावर परिणाम होतो. भारत जागतिक संघर्षात सहभागी नसला तरी त्याचे आर्थिक परिणाम टाळणे शक्य नसते, हा अनुभव नवाच नाही. युद्धाचा विस्तार नेहमी रणांगणावरून नव्हे तर प्रतिक्रियांमधून होतो. इराणने अमेरिकन लष्करी तळांना संभाव्य लक्ष्य मानले आहे. आखातातील अमेरिकन उपस्थितीवर थेट हल्ला झाला तर संघर्ष क्षणात प्रादेशिक युद्धात रूपांतरित होईल. आणि इराणची रणनीती पारंपरिक युद्धापुरती मर्यादित राहील असे गृहित धरणे चुकीचे ठरेल. सायबर हल्ले, प्रॉक्सी गट, सागरी व्यत्यय ही सर्व साधने युद्धाला अस्पष्ट पण अधिक परिणामकारक बनवतात. युद्धातील सर्वात मोठा धोका हेतूपेक्षा चुकीच्या अंदाजाचा असतो. इतिहासात अनेक संघर्ष नियोजनामुळे नव्हे तर अपघाती वाढींमुळे व्यापक झाले आहेत. एखादी अनपेक्षित घटना विशेषतः अमेरिकन नागरिकांचा बळी परिस्थिती क्षणात बदलू शकते. त्यानंतर राजकीय नेतृत्वाकडे माघारीची जागा राहत नाही. भारतासाठी हे संकट केवळ धोरणात्मक नाही तर मानवी आहे. पश्चिम आशियात कार्यरत असलेल्या मोठ्या भारतीय समुदायाची सुरक्षितता ही तातडीची चिंता आहे. त्याच वेळी भारताला इस्रायलशी संरक्षण सहकार्य, आखाती देशांवरील ऊर्जा अवलंबित्व आणि इराणमार्गे प्रादेशिक संपर्क या तिन्ही हितसंबंधांमध्ये संतुलन साधावे लागते. दीर्घकालीन युद्ध ही संतुलनकला अधिक कठीण करेल. यापेक्षाही व्यापक परिणाम जागतिक व्यवस्थेवर होऊ शकतात. जर राजवट बदल हे स्वीकारार्ह युद्ध उद्दिष्ट ठरले, तर इतर राष्ट्रे स्वतःच्या सुरक्षेसाठी अणु किंवा प्रगत लष्करी क्षमतांकडे वळतील. अप्रसाराची चौकट कमकुवत होईल आणि महासत्तांमधील स्पर्धा अधिक तीव्र बनेल. म्हणजे एका युद्धातून अनेक संभाव्य संघर्षांची बीजे तयार होतील. इतिहासाची पुनरावृत्ती अशीच होते मोठ्या उद्दिष्टांनी सुरू झालेली युद्धे नियोजित शेवटाला पोहोचत नाहीत. राजवट टिकली तर संघर्ष वाढतो; ती कोसळली तर अराजकता निर्माण होते. दोन्ही परिस्थितींमध्ये स्थैर्य दुर्मिळ ठरते. पश्चिम आशियातील प्रत्येक वाढ जगाला आठवण करून देते की भू-राजकारणात अंतर हा संरक्षणाचा उपाय नसतो. ऊर्जा, व्यापार आणि सुरक्षा यांच्या परस्परसंबंधित जगात एका प्रदेशातील युद्ध जागतिक व्यवस्थेला हादरा देऊ शकते. सध्या दिसणारा संघर्ष हा केवळ आणखी एक लष्करी कारवाई नसून, जागतिक स्थैर्याच्या मर्यादांची परीक्षा आहे.

-

## महिलांच्या आर्थिक सबलीकरणाला 'पवनाथडी जत्रे'चे बळ

### समाज विकास विभागाच्या उपक्रमाला महापौर रवि लांडगे यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : पिंपरी चिंचवड शहरातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आयोजित 'पवनाथडी जत्रा' प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या समाज विकास विभागातर्फे आयोजित या जत्रेला महापौर रवि लांडगे यांनी भेट देत महिला उद्योजिकांशी संवाद साधला.



यावेळी बोलताना महापौर लांडगे म्हणाले, "पवनाथडी जत्रा ही महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी मोठे व्यासपीठ आहे. महिलांना त्यांच्या कौशल्यावर आधारित व्यवसाय उभारण्याची आणि थेट बाजारपेठ मिळवण्याची संधी येथे उपलब्ध होते. भविष्यात अशा उपक्रमांमुळे महिला अधिक सक्षम होतील."

जत्रेमध्ये शहरातील विविध महिला बचत गटांनी सहभाग नोंदवला असून त्यांच्या उत्पादनांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. घरगुती पदार्थ, पारंपरिक खाद्यपदार्थ, लोणची, पापड, मिठाया, हस्तकला वस्तू, सजावटीचे साहित्य आणि सणासुदीच्या वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. महिलांनी स्वहस्ते तयार केलेल्या उत्पादनांमुळे जत्रेत वैविध्य आणि गुणवत्ता दिसून येत आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांना आर्थिक स्वावलंबनाकडे नेणे, त्यांच्या उद्योजकतेला चालना देणे आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. पवनाथडी जत्रेमुळे महिलांना आत्मविश्वास प्राप्त होत असून त्यांच्या उत्पन्नातही वाढ होत आहे.

महापौर लांडगे यांनी स्टॉलधारक महिलांचे कौतुक करत, "शहरातील माझ्या भगिनींच्या समस्यांसाठी हा लाडका भाऊ त्यांच्या पाठीशी उभा राहील," असे आश्वासन दिले. तसेच नागरिकांनी जत्रेला भेट देऊन महिला उद्योजकांच्या उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## पिंपरी-चिंचवडच्या वीज प्रश्नावर आमदार शंकर जगताप आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ ११०० कोटींच्या आराखड्याला गती

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वीज समस्यांवरून आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत आक्रमक भूमिका घेत शासनाचे लक्ष वेधले. वाढती लोकसंख्या, आयटी पार्कचा विस्तार आणि औद्योगिक गरजांमुळे वीज यंत्रणेचे सक्षमीकरण तातडीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना (RDSS) आणि एनपीएसएएस अंतर्गत प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्याची मागणी करत त्यांनी ताथवडे उपकेंद्राचा दीड वर्षांपासून प्रलंबित प्रस्ताव तात्काळ मार्गी लावण्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच मोशी, चऱ्होली व ताथवडे येथे अतिउच्चदाब उपकेंद्रे, भूमिगत केबल्स, नवीन ट्रान्सफॉर्मर व शाखा कार्यालयांची गरज अधोरेखित केली. ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी उत्तर देताना पुणे जिल्ह्यासाठी ११०० कोटींच्या आराखड्याला गती देण्यात येणार असून त्यातील सुमारे ३५० कोटी पिंपरी-चिंचवडसाठी असल्याचे सांगितले. ताथवडे उपकेंद्राच्या विलंबाबाबत चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. लवकरच पुण्यात बैठक घेऊन सर्व प्रलंबित कामांचा आढावा घेतला जाणार आहे. या निधीमुळे औद्योगिक व निवासी ग्राहकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी अभिषेक बारणे बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या स्थायी समिती सभापतीपदी अभिषेक बारणे यांची बिनविरोध निवड झाली. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात विशेष सभा घेऊन ही निवड प्रक्रिया पार पडली.

सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन अर्जांची छाननी केल्यानंतर अभिषेक बारणे यांचा एकमेव अर्ज वैध ठरला. अन्य कोणताही अर्ज प्राप्त न झाल्याने पिठासीन अधिकारी एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी बारणे यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविणकुमार जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांसह विभागप्रमुख उपस्थित होते. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले.

निवडीनंतर महापौर रवि लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपमहापौर शर्मिला बाबर तसेच नगरसदस्यांनी बारणे यांचे अभिनंदन केले. शहर विकासाच्या कामांना गती देण्याचा निर्धार नव्या सभापतींनी व्यक्त केला.

## मराठी भाषा गौरव दिनी काव्याची उधळण; पिंपरी चिंचवडमध्ये कवींकडून मराठीला अभिवादन

### महापालिकेच्या आयोजनातील कविसंमेलनाला रसिकांची उत्स्फूर्त दाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : अक्षरांचा सुगंध, शब्दांची लय आणि माय मराठीबद्दलचा अपार अभिमान अशा उत्साहपूर्ण वातावरणात पिंपरी चिंचवड शहरातील कवींकडून मराठीच्या गौरवशाली परंपरेला काव्यात्मक अभिवादन करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकातर्फे चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात स्थानिक कवींच्या सहभागाने कविसंमेलन रंगले. ज्येष्ठ कवी राज आहेरराव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या संमेलनाला विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड आणि अनेक रसिक उपस्थित होते.

कविसंमेलनात कवी हेमंत जोशी यांनी "रक्तात नांदतो शब्द..." या ओळींनी सभागृह भारावून टाकले. सुहास घुमरे यांनी मराठीच्या ऐतिहासिक पाळेमुळांचा मागोवा घेतला, तर सीमा गांधी यांनी माय मराठीवरील निष्ठा भावपूर्ण शब्दांत व्यक्त केली. मानसी चिटणीस यांनी संतपरंपरेचा वारसा अधोरेखित केला, तर मिनल साकोरे यांनी आधुनिक जीवनातील बदलत्या भावविश्वावर भाष्य केले.

याशिवाय अरुण बोऱ्हाडे, सुरेश कंक, चंद्रकांत धस, डॉ. पौर्णिमा कोल्हे, साविताई इंगळे, माधुरी विधाते, वंदना इन्नाणी, नंदकुमार कांबळे, अण्णा जोगदंड, मनीष परिहार, दिनेश साबळे आणि नेहा जाधववार यांनीही आपल्या सशक्त सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. सुभाष चव्हाण यांनी शंखवादन सादर करून कार्यक्रमात वेगळे आकर्षण निर्माण केले.

### आमदार अमित गोरखे यांचा प्रश्न ठरला निर्णायक

## ताथवडे शासकीय जमीन प्रकरणात दोषींवर निलंबन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार अमित गोरखे यांनी पुणे जिल्ह्यातील ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या शासकीय जमिनीच्या बेकायदेशीर विक्रीच्या गंभीर प्रकरणाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांच्या प्रश्नानंतर शासनाने दोषींवर निलंबनाची कारवाई केली असून, पोलीस तपासही सुरू आहे.



नेमके प्रकरण: ताथवडे (ता. मुळशी, जि. पुणे) येथील गट क्रमांक ३२ च्या जमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी शासनाची पूर्वपरवानगी अनिवार्य होती. ७/१२ उताऱ्यावर "मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचा ताबा" आणि "शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय खरेदी-विक्रीस बंदी" असे स्पष्ट निर्देश असूनही हवेली क्र. १७ उपनोंदणी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नियमबाह्य नोंदणी केली. जमिनीचा मूळ मालक मृत असतानाही, संगणकीय प्रणालीतील 'स्किप' पर्यायाचा गैरवापर करून खरेदीखत नोंदविण्यात आले.

सभागृहातील प्रतिक्रिया: आमदार गोरखे यांनी प्रश्नातून विचारले की, अशा प्रकारच्या तांत्रिक त्रुटींचा गैरवापर इतर जिल्ह्यांतही होतोय का? तसेच दोषींवर कठोर कारवाईची मागणी करून पारदर्शकतेसाठी प्रशासनाच्या उत्तरदायित्वाकडे लक्ष वेधले.

दोषींवर निलंबन व फौजदारी कारवाई: महसूल मंत्री म्हणाले की, प्रकरणात प्रभारी दुय्यम निबंधक विद्या बडे आणि वरिष्ठ लिपिक यांना निलंबित करण्यात आले आहे. पशुसंवर्धन आयुक्तांच्या तक्रारीवरून दापोडी पोलीस ठाण्यात १५ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल केला असून चौकशी वेगाने सुरू आहे.

आमदार गोरखे यांचे मत: "शासकीय जमिनी हडपणे आणि जनतेच्या पैशावर दरोडा टाकणे खपवून घेतले जाणार नाही. मूळ सूत्रधार आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई होईपर्यंत माझा पाठपुरावा सुरू राहील.

पारदर्शक कारभारासाठी अशा प्रवृत्तींना आळा घालणे अत्यावश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

या कारवाईमुळे पुणे जिल्ह्यातील सरकारी जमिनींच्या बेकायदेशीर व्यवहारांवर नियंत्रण येण्याची अपेक्षा असून, इतर विभागांनाही यासाठी सतर्क राहण्याचे संदेश मिळाले आहेत. आमदार गोरखे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे या प्रकरणात निर्णय जलद गतीने झाला, जे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश ठरत आहे.

**'महाराष्ट्र सर्वात स्वच्छ हवेचे राज्य व्हावे'**

- राज्यातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित करत महाराष्ट्राला 'सर्वात स्वच्छ हवेचे राज्य' बनवण्याचा संकल्प मांडला. केंद्राच्या National Clean Air Programme (NCAP) अंतर्गत राज्यातील १७ शहरांना मिळालेल्या निधीचा प्रभावी आणि मूळ कारणांवर प्रहार करणारा वापर व्हावा, अशी त्यांनी मागणी केली.
- सध्या रस्ते स्वच्छता आणि धूळ नियंत्रणाची कामे सुरू असली तरी औद्योगिक उत्सर्जनावर नियंत्रण, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि सक्षम वाहतूक नियोजनावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
- तसेच सर्व प्रकल्पांचे 'थर्ड पार्टी ऑडिट' आणि 'इम्पॅक्ट असेसमेंट' बंधनकारक करून पारदर्शकता सुनिश्चित करण्याची आग्रही मागणीही त्यांनी केली. सरकार यावर कोणते ठोस धोरण आखते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघर्षयात्राचे प्रकाशन उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ राष्ट्रीय अस्मिता व समाजजागृतीचा दस्तऐवज

**पिंपळे सौदागर** : पिंपळे सौदागर येथे शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सांस्कृतिक वार्तापत्र प्रकाशित 'हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघर्षयात्रा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या ग्रंथाचे प्रकाशन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चे जिल्हा कार्यवाह नरेंद्रजी पेंडसे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे उपस्थित होते. तसेच सांस्कृतिक वार्तापत्रचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत विक्री अधिकारी निखिल देविदास वझे यांची उपस्थिती लाभली.

या ग्रंथात गेल्या शंभर वर्षांतील हिंदू समाजजागरणाची वाटचाल, विविध सामाजिक व राष्ट्रीय चळवळी, संघटनात्मक कार्य आणि संघर्षमय प्रवासाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. समाजपरिवर्तन, सांस्कृतिक जतन, राष्ट्रीय अस्मिता आणि संघटनशक्ती यांचे ऐतिहासिक संदर्भांसह विवेचन पुस्तकात मांडण्यात आले आहे.

मराठी भाषा दिनानिमित्त शुभेच्छा देताना नरेंद्रजी पेंडसे यांनी मराठी भाषेची समृद्ध साहित्य परंपरा अधोरेखित केली. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण रक्षण, स्वबोध आणि नागरी कर्तव्य या विषयांवर जनजागृती सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शत्रुघ्न काटे यांनी हा ग्रंथ प्रेरणादायी दस्तऐवज असल्याचे सांगत तरुणांनी इतिहासाचा अभ्यास करण्याचे आवाहन केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आंबेगावमध्ये नारळ खरेदीतून परप्रांतीय तरुणांना रोजगार

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात नारळ हंगामाला सुरुवात होताच उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश येथील तरुण मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. हे तरुण शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झाडावर चढून नारळ काढतात व थेट खरेदी करून बाजारात विक्री करतात. मंचर, नारायणगाव, राजगुरुनगर, चाकण व पुणे येथे विक्री होत आहे. रोखीच्या व्यवहारामुळे शेतकऱ्यांना तात्काळ पैसे मिळत असून या व्यवसायातून तरुणांना चांगला रोजगार उपलब्ध होत आहे.

### वळती येथे 'आनंदी बाजार'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'आनंदी बाजार' उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी १३२ स्टॉल उभारून पालेभाज्या, फळे, घरगुती पदार्थ व हस्तकला वस्तूंची विक्री केली. या उपक्रमातून सुमारे एक लाख रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती मुख्याध्यापक अशोक मावळे यांनी दिली. खरेदी-विक्री व हिशोब विद्यार्थ्यांनी स्वतः सांभाळत व्यवहारिक ज्ञान मिळवले. ग्रामस्थ व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

### मंगळसूत्र चोरी प्रकरणी तिघांना अटक

**मंचर :** मंचर एसटी बसस्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत सोन्याचे मंगळसूत्र चोरी करणाऱ्या टोळीला मंचर पोलिसांनी अटक केली. बेबीनंदा कसबे (लातूर), स्वाती तपसाळे व शिवाजी घोलप (धाराशिव) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी नारायणगाव-पुणे मार्गावर सापळा रचून एमएच १२ एफपी १७४५ क्रमांकाच्या कारसह त्यांना ताब्यात घेतले. २४ ग्रॅम सोन्याचे दागिने व वाहन जप्त करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

---

**८.८३ लाख मे.टन ऊस गाळप; ९.२७ लाख साखर पोती उत्पादन-शेतकऱ्यांना २८० कोटींचे एफआरपी भुगतान**

# भीमाशंकर कारखाना: गळीत हंगामाची यशस्वी सांगता!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** दत्तात्रयनगर पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ चा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण केला असून ८ लाख ८३ हजार ६९ मे.टन ऊस गाळप करत ९ लाख २७ हजार ११७ साखर पोत्यांचे उत्पादन साध्य केले आहे. कारखान्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी तसेच ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदारांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, कारखान्याचे संस्थापक संचालक व माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुयोग्य नियोजनामुळे नोंद असलेल्या संपूर्ण उसाचे गाळप करण्यात यश आले.

सन २०२५-२६ हंगामात १५ फेब्रुवारीअखेर गाळप झालेल्या उसासाठी शेतकऱ्यांना एफ.आर.पी.प्रमाणे प्रतिमे.टन ३,२७३ रुपये दराने तब्बल २८० कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. वेळेवर दिलेले योग्य दर आणि पारदर्शक व्यवहार यामुळे कारखान्याबद्दल शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे बेंडे यांनी नमूद केले.

कारखान्यामार्फत "दत्तात्रय वळसे पाटील ऊस उत्पादकता वाढ लक्ष २०२०" ही महत्त्वाकांक्षी योजना वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु. यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, माती व पाणी परीक्षण, उधारीवर ताग व ऊस बेणे वाटप, ऊस रोपवाटिका, ठिबक सिंचनासाठी अर्थसहाय्य, द्रवरूप जीवाणू खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैविक किड नियंत्रण, इपीएन, रासायनिक खते व औषधे, पाचट कुट्टी आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

याशिवाय कमी खर्चात ड्रोन फवारणीची सुविधा देण्यात येत असून स्वतंत्र ऊस विकास विभाग स्थापन करून अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जाते. शेतकऱ्यांनी या सर्व सुविधांचा लाभ घेत उत्पादनवाढीवर भर द्यावा, असे आवाहन चेअरमन बेंडे यांनी केले. सुसंघटित व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांप्रती बांधिलकी यामुळे भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची यशस्वी वाटचाल अधिक बळकट होत असल्याचे चित्र आहे.

---

## उत्तर चाकण पोलीस ठाणे येथे ४७ वर्षीय महिलेवर खंडणीचा गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ बलात्काराच्या तक्रारीची धमकी देत ३ लाख रुपये व फ्लॅटची मागणी; २७ वर्षीय व्यावसायिकाची फिर्याद

**चाकण :** चौदा वर्षांपासून सुरू असलेल्या शारीरिक संबंधांबाबत पोलिसांत बलात्काराची तक्रार नोंदवू नये म्हणून ४७ वर्षीय महिलेने २७ वर्षीय तरुणाकडे ३ लाख रुपये आणि एक फ्लॅटची मागणी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित महिलेविरुद्ध खंडणीसह विविध कलमान्वये उत्तर चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी तरुण हा खेड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील व्यावसायिक असून त्याच्या तक्रारीनुसार २०१२ ते २०२६ या कालावधीत संबंधित महिलेसोबत त्याचे शारीरिक संबंध होते. या संबंधांबाबत पोलिसांत बलात्काराची तक्रार करणार नसल्याच्या बदल्यात महिलेने पैशांची व सदनिकेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

२४ जानेवारी २०२६ रोजी चाकण येथील एकता नगर परिसरातील हॉटेल एव्हरेस्ट इन येथे संबंधित महिलेने तरुणास व त्याच्या नातेवाईकांना बोलावून घेतले. तेथे तिने ३ लाख रुपये व एका फ्लॅटची मागणी केली. त्यानंतर २७ जानेवारी २०२६ रोजी फिर्यादी तरुणाने ९९ हजार रुपये मोबाईलद्वारे ऑनलाईन पाठवले, तसेच सुमारे ५० हजार रुपये रोख स्वरूपात दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. उर्वरित रक्कम आठ दिवसांत न दिल्यास बलात्काराचा गुन्हा दाखल करीन, अशी धमकी देत पुन्हा पैशांची मागणी केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पिंपरी-चिंचवड परिसरातील पांजरपोळ, भोसरी भागात वास्तव्यास असलेल्या ४७ वर्षीय महिलेविरुद्ध खंडणीसह इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## चाकण नगर परिषद कडून थकीतदारांवर कारवाईचा बडगा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



+ मालमत्ता व पाणीपट्टी कर वेळेत भरा; अन्यथा नळ कनेक्शन तोडणे, जप्तीची कारवाई – मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांचा इशारा

**चाकण :** मार्च महिना सुरू होताच चाकण नगर परिषदेने थकीत मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुलीसाठी विशेष मोहीम हाती घेतली असून कर न भरणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन करत संभाव्य कारवाई टाळण्याचा सल्ला दिला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील थकीत कर वसुलीसाठी नगर परिषदेच्या सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रभागनिहाय पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत शहरातील थकबाकीदार मालमत्ता धारकांवर थेट कारवाई केली जाणार आहे. थकबाकी असलेल्या मालमत्ता, सोसायट्या, दुकाने, शॉप्स तसेच बँकांचे नळ कनेक्शन तोडणे, मालमत्ता जप्ती करणे, थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे आणि शहरातील विविध भागांत नावांसह फ्लेक्स लावणे, अशा कठोर उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

"नगर परिषदेच्या विकासकामांसाठी कर वसुली अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून कराचा भरणा करावा," असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले. कर विभाग प्रमुख सुनील गोर्डे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

नागरिकांच्या सोयीसाठी नगर परिषदेच्या वसुली विभागाचे कार्यालय शनिवार, रविवार तसेच इतर सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात आले आहे. शहरातील विविध सहकारी सोसायट्यांमध्ये विशेष वसुली कॅम्पचे आयोजन करण्यात आले असून, थकीतदारांना कर भरण्यासाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नगर परिषदेच्या या विशेष मोहिमेमुळे थकीत कर वसुलीत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी तातडीने मालमत्ता व पाणीपट्टी कराचा भरणा करावा, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी केले आहे.

---

## खेड कृषी उत्पन्न बाजार समिती चाकण बाजारात कांदा दरात मोठी घसरण!

**प्रचंड आवक आणि शासनाच्या धोरणाचा परिणाम; प्रतिकिलो अवघे १० रुपये दर**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटमध्ये शनिवारी (दि. २८ फेब्रुवारी) कांद्याची प्रचंड आवक झाल्याने दरात मोठी घसरण झाली. तब्बल ९ हजार ५०० क्विंटल कांदा बाजारात दाखल झाला असून वाढलेल्या आवकेमुळे प्रतिक्विंटल सुमारे २०० रुपयांची घसरण नोंदवली गेली. सध्या कांद्याला सरासरी १,००० रुपये तर कमाल १,३०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असला तरी किरकोळ बाजारात प्रतिकिलो अवघा १० रुपयांचा दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मते, उत्पादन खर्च काढण्यासाठी किमान २५ रुपये प्रतिकिलो दर मिळणे आवश्यक आहे. मात्र सध्याच्या कवडीमोल दरामुळे खर्चही भरून निघत नसल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. मागील एक वर्षापासून दर नसल्याने अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती तसेच शासनाच्या निर्यात धोरणामुळे कांद्याच्या दरावर दबाव येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. अत्यल्प दरात कांदा विकावा लागत असल्याने शेती टिकवणे कठीण होत चालले आहे. यापूर्वी २०२२-२३ मध्ये शासनाने प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान दिले होते. मात्र सध्याच्या गंभीर परिस्थितीत किमान १,००० रुपये प्रतिक्विंटल अनुदान जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे. "कांद्याचा उत्पादन खर्चही सुटत नाही. दर नसल्यामुळे शेतकरी पूर्णपणे अडचणीत सापडला आहे," अशी प्रतिक्रिया अनेक उत्पादकांनी व्यक्त केली. बाजारातील घसरणीमुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन कांदा उत्पादकांना आर्थिक मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

---

## "वकिली हा व्यवसाय नसून समाजकार्याचे प्रभावी साधन" – न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर

**जुन्नर येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजना महामेळावा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी असून वकिली हा केवळ व्यवसाय नसून समाजकार्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पुणे जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर यांनी केले. ओझर (ता. जुन्नर) येथील श्री विघ्नहर सांस्कृतिक भवनात आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजना महामेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती जुन्नर आणि तालुका बार असोसिएशन जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र के. महाजन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार, ॲड. हेमंत हाडवळे आदी मान्यवर उपस्थित होते. न्यायमूर्ती डॉक्टर यांनी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत असल्याचे नमूद केले.

या योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी असे महाशिबीर महत्त्वपूर्ण ठरतात, असे त्यांनी सांगितले. महेंद्र महाजन यांनी रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा उल्लेख केला. अपघाती मृत्यू झाल्यास ५ लाख रुपये व जखमींसाठी ५० हजार ते २.५ लाख रुपयांपर्यंत भरपाईची तरतूद असल्याची माहिती त्यांनी दिली.

---

## तांडा वस्त्यांच्या विकासासाठी ८.९० कोटींची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** सन २०२५-२६ च्या पंचवार्षिक बृहत आराखड्यानुसार वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत आंबेगाव व शिरुर तालुक्यातील तांडा वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधांसाठी एकूण ८ कोटी ९० लाख रुपयांची मंजुरी मिळाल्याची माहिती माजी उपाध्यक्ष तथा सदस्य विवेक वळसे पाटील यांनी दिली.

या योजनेअंतर्गत आंबेगाव तालुक्यातील ११ कामांसाठी २ कोटी ६० लाख रुपये, तर शिरुर तालुक्यातील ३० कामांसाठी ६ कोटी ३० लाख रुपये मंजूर झाले आहेत. सोलर व एलईडी पथदिवे, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, अंतर्गत रस्ते, पेव्हींग ब्लॉक, बंदिस्त गटार, सार्वजनिक शौचालये, समाजमंदिर, सभागृह, स्मशानभूमी सुधारणा व व्यायामशाळा आदी कामांचा यात समावेश आहे.

---

## शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी..." कुसुमाग्रज जयंतीनिमित्त विविध उपक्रम**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाच्या शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय आणि रामचंद्र पाटील औटी कनिष्ठ महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी) येथे जागतिक मराठी भाषा दिन तसेच कविवर्य वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून गुरुदेव अध्यात्मिक शक्तीपीठ, आळंदीचे संस्थापक-अध्यक्ष ह.भ.प. ज्योतिषाचार्य पांडुरंग महाराज शितोळे (शास्त्री) उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग मिसाळ होते.

मराठी विभागाचे सहाय्यक प्रा. डॉ. संजीव कांबळे यांनी कार्यक्रमामागील उद्दिष्टे स्पष्ट करत मराठी भाषा दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. मराठी भाषेचा इतिहास, तिची परंपरा आणि वर्तमानातील स्थान यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

ह.भ.प. पांडुरंग महाराज शितोळे यांनी संस्कृतपासून आजपर्यंत मराठी भाषेतील स्थित्यंतरे उलगडून सांगितली. संत साहित्याने मराठीला दिलेले योगदान असामान्य असल्याचे त्यांनी नमूद केले. "माझा मऱ्हाठाची बोलू कौतुके..." या ज्ञानेश्वर महाराज यांच्या ओवीचा उल्लेख करत मराठी भाषेच्या जतनासाठी संतांनी केलेल्या कार्याचा गौरव केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. पांडुरंग मिसाळ यांनी तुकाराम महाराज यांच्या "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने..." या अभंगाच्या ओळींवर भाष्य करत शब्दांचे सामर्थ्य अधोरेखित केले. मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीचे वैभव असून तिच्या सुमारे ५२ बोली असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणात मराठीचे योगदान मोठे असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास प्राध्यापकवर्ग, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदवला.

सूत्रसंचालन प्रा. परमेश्वर भताशे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. दिपाली ताम्हाणे यांनी मानले. सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

**दरात २०० रुपयांची घसरण; वाटाणा, गाजर, हिरवी मिरचीची भरघोस आवक; एकूण उलाढाल ६ कोटी ७५ लाख रुपये**

# खेड कृषी उत्पन्न बाजार समिती चाकण मार्केटमध्ये कांद्याची प्रचंड आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी (दि. १ मार्च २०२६) कांद्याची प्रचंड आवक झाल्याने दरात प्रती क्विंटल सुमारे २०० रुपयांची घसरण झाली. एकूण ९ हजार ५०० क्विंटल कांद्याची नोंद झाली असून सरासरी भाव १,००० रुपये तर कमाल १,३०० रुपये प्रतिक्विंटल मिळाला. घाऊक बाजारातील या घडामोडींमुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये मिश्र प्रतिक्रिया उमटल्या.

बटाट्याची १,५०० क्विंटल आवक झाली असून त्याला कमाल १,२०० रुपये भाव मिळाला. हिरव्या मिरचीची ३१७ क्विंटल आवक झाली असून ६,००० ते ७,००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाले. दुसरीकडे वांगी, भेंडी, दोडका, चवळी, कोबी, फ्लॉवर व भोपळ्याचे दर तेजीत राहिले. लसणाची मात्र किरकोळ आवक नोंदवली गेली.

फळभाज्यांमध्ये टोमॅटो ३३१ क्विंटल (८०० ते १,००० रु.), कोबी २४१ क्विंटल (४०० ते ५०० रु.), फ्लॉवर २०५ क्विंटल (१,००० ते १,२०० रु.), वांगी ८३ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), भेंडी ८७ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु.), दोडका ६४ क्विंटल (४,००० ते ४,५०० रु.), कारली ८२ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा ६६ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), काकडी १०६ क्विंटल (८०० ते १,००० रु.), फरशी ४२ क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), वालवड ७३ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), ढोबळी मिरची १६८ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु.), चवळी ३३ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), वाटाणा ३१० क्विंटल (२,२०० ते २,४०० रु.), गाजर १५५ क्विंटल (१,००० ते १,३०० रु.), गवार २५ क्विंटल (७,००० ते ८,००० रु.) आणि आद्रक १७० क्विंटल (३,५०० ते ४,००० रु.) अशी आवक नोंदली गेली. पालेभाज्यांमध्ये मेथीच्या १६,२७२ जुड्या (१,००० ते १,३०० रु.), कोथिंबीर ३६,८६४ जुड्या (५०० ते ८०० रु.), शेपू ३,२८५ जुड्या (६०० ते ८०० रु.) आणि पालक २,६१९ जुड्या (५०० ते ८०० रु.) विक्रीसाठी आल्या. प्रचंड आवक असूनही पालेभाज्यांचे दर तेजीत राहिले.

जनावरांच्या बाजारात ४० जर्सी गाईंपैकी ३० (१५,००० ते ७०,००० रु.), ९० बैलांपैकी ६५ (१०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशींपैकी ९५ (३०,००० ते ८०,००० रु.) विकल्या गेल्या. १०,१०० शेळ्यामेंढ्यांपैकी ९,५०० ची विक्री होऊन २,००० ते १५,००० रुपये दर मिळाले. दिवसभरातील एकूण उलाढाल सुमारे ६ कोटी ७५ लाख रुपये झाली.

## सारांश वृत्त

### १०० आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली:** मध्य पूर्वेतील संकटामुळे विमान कंपन्यांना कामकाजात अडथळा येत असल्याने रविवारी दिल्ली विमानतळावर किमान १०० आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. एका सूत्राने सांगितले की, ६० आंतरराष्ट्रीय निर्गमने आणि ४० आगमन रद्द करण्यात आले आहेत. "मध्य पूर्वेतील विकसित होत असलेल्या राजकीय परिस्थितीमुळे, पश्चिमेकडे जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये व्यत्यय येऊ शकतो किंवा वेळापत्रकात बदल होऊ शकतात," असे डायलने एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.




### फेब्रुवारीमध्ये जीएसटी संकलनात वाढ

**नवी दिल्ली** : आयातीतून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाल्यामुळे फेब्रुवारीमध्ये एकूण जीएसटी संकलन ८.१ टक्क्यांनी वाढून १.८३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले. एकूण देशांतर्गत महसूल ५.३ टक्क्यांनी वाढून सुमारे १.३६ लाख कोटी रुपये झाला, तर एकूण आयात महसूल १७.२ टक्क्यांनी वाढून ४७,८३७ कोटी रुपये झाला. एकूण परतफेड १०.२ टक्क्यांनी वाढून २२,५९५ कोटी रुपये झाली.




### भुवनेश्वरमध्ये युट्यूबरची हत्या, तिघांना अटक

**भुवनेश्वर** : भुवनेश्वरमध्ये एका युट्यूबरची चाकूने वार करून हत्या करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली. शनिवारी रात्री १० वाजताच्या सुमारास मंचेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जीजीपी कॉलनीमध्ये ही घटना घडली आणि मृताचे नाव राहुल महाराणा असे आहे, तो शहरातील पळसुनी परिसरातील रहिवासी होता. एका अधिकाऱ्याने सांगितले की, तिघांशी झालेल्या वादानंतर महाराणा यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला.

## इराणकडून इस्रायल व अमेरिकन तळांवर नव्याने हल्ले

# मध्यपूर्वेत युद्धाचा भडका; परिस्थिती गंभीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाने रविवारी आणखी गंभीर वळण घेतले असून इराणने इस्रायल आणि अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र व ड्रोन हल्ल्यांची नवी लाट सुरू केल्याची माहिती आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांनी दिली आहे. अमेरिके-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनेई ठार झाल्यानंतर हा संघर्ष उघड युद्धाच्या टप्प्यात प्रवेश करत असल्याचे चित्र दिसत आहे.



इराणी माध्यमांच्या वृत्तानुसार, रविवारी पहाटे इस्रायल तसेच पश्चिम आशियातील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करत मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्र डागण्यात आले. बहरीन, कतार, कुवेत आणि इराकमधील अमेरिकन ठिकाणांवरही हल्ल्यांचे प्रयत्न झाल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी स्फोट आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याची नोंद झाली असून प्रादेशिक सुरक्षा यंत्रणा उच्च सतर्कतेवर ठेवण्यात आल्या आहेत.

या आधी अमेरिके आणि इस्रायलने इराणमधील लष्करी व नेतृत्वाशी संबंधित ठिकाणांवर व्यापक हवाई कारवाई केली होती.

या कारवाईत इराणच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसह सर्वोच्च नेत्यांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला, ज्यामुळे तेहरानने "तीव्र प्रत्युत्तर" देण्याची घोषणा केली होती.

हल्ल्यांनंतर इस्रायलमध्ये अनेक भागांत हवाई हल्ला इशारे (सायरन) वाजवण्यात आले असून नागरिकांना सुरक्षित आश्रयस्थानी जाण्याचे निर्देश देण्यात आले. गल्फ देशांमध्येही हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आल्या आहेत. काही आंतरराष्ट्रीय विमानसेवा रद्द करण्यात आल्याने हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

दरम्यान, या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवरील हालचालींवर निर्बंध घालण्याचा इशारा दिल्यानंतर तेलपुरवठा आणि किमतींबाबत अनिश्चितता वाढली आहे. भारतासह अनेक देश परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

संयुक्त राष्ट्रांसह अनेक देशांनी तणाव कमी करण्याचे आवाहन केले असून व्यापक प्रादेशिक युद्ध टाळण्यासाठी राजनैतिक प्रयत्न सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. परिस्थिती वेगाने बदलत असल्याने पुढील काही दिवस मध्यपूर्वेसाठी निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इस्त्रायल-अमेरिका हल्ल्यानंतर तणाव शिगेला

### इराणचा मोठ्या प्रत्युत्तराचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इस्त्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त लष्करी कारवाईत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा इस्त्रायलने केल्यानंतर मध्यपूर्वेतील तणाव अत्यंत तीव्र झाला आहे. या घटनेनंतर संतप्त झालेल्या इराणने अमेरिका आणि इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात प्रत्युत्तरात्मक हल्ला करण्याचा इशारा दिला असून परिस्थिती युद्धाच्या आणखी धोकादायक टप्प्याकडे जात असल्याचे संकेत मिळत आहेत.

इराणच्या कठोर भूमिकेनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही तीव्र प्रतिक्रिया देत इराणला पुन्हा इशारा दिला आहे. इराणने मोठा हल्ला केल्यास अमेरिकेकडून अत्यंत शक्तिशाली आणि अभूतपूर्व प्रत्युत्तर दिले जाईल, अशी स्पष्ट चेतावणी ट्रम्प यांनी दिली. त्यांनी ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणने मोठ्या हल्ल्याचा इशारा दिला असला तरी त्यांनी तसे पाऊल उचलू नये, अन्यथा त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

दरम्यान, वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने संयम आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात सर्व संबंधित देशांनी तणाव वाढवणारी पावले टाळावीत, नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे आणि राजनैतिक मार्गाने प्रश्न सोडवावेत, असे म्हटले आहे. तसेच सर्व देशांच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करण्याची गरजही भारताने अधोरेखित केली आहे.

भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सक्रिय राजनैतिक संपर्क साधला आहे. त्यांनी इस्त्रायलचे परराष्ट्रमंत्री तसेच इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अरघची यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि राजनैतिक तोडगा काढण्याचे आवाहन केल्याची माहिती 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिली.

## खामेनी यांच्या मृत्यूचे पाकिस्तानात पडसाद

### कराचीतील अमेरिकन दूतावासावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कराची :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूच्या दाव्यानंतर मध्यपूर्वेतील तणावाचे पडसाद आता पाकिस्तानातही उमटू लागले आहेत. कराची येथील अमेरिकन दूतावासावर संतप्त जमावाने हल्ला केल्याची घटना समोर आली असून या हिंसाचारात किमान आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिक माध्यमांच्या हवाल्याने समोर आली आहे.

अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त कारवाईत खामेनी यांना ठार केल्याचा दावा केल्यानंतर अनेक इस्लामी देशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पाकिस्तानातील कराची शहरात मोठ्या प्रमाणावर निदर्शने आयोजित करण्यात आली होती. या निदर्शनांना अचानक हिंसक वळण लागल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. संतप्त जमावाने कराचीतील अमेरिकन दूतावासाच्या परिसरात घुसण्याचा प्रयत्न करत सुरक्षा व्यवस्था भेदली. दगडफेक, काठ्यांनी तोडफोड तसेच इमारतीच्या काही भागांना आग लावल्याची माहिती समोर आली आहे. दूतावासाच्या काचा फोडण्यात आल्या असून परिसरात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सुरक्षा दलांना हस्तक्षेप करावा लागला.

निदर्शनकर्ते आणि सुरक्षा रक्षक यांच्यात झालेल्या संघर्षात किमान आठ जणांचा मृत्यू झाला असून ३० हून अधिक जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

## अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यात खामेनी ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान/वॉशिंग्टन :** जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मोठी घडामोड समोर आली आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त लष्करी कारवाईत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा इस्रायलने केला आहे.



इस्रायल आणि अमेरिकेकडून खामेनी यांच्या कार्यालयाजवळ क्षेपणास्त्र डागण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच त्यांच्या निवासस्थानाजवळ बंकर-बस्टिंग क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या कारवाईत खामेनी ठार झाल्याचा दावा इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केला. नेतान्याहू यांच्या घोषणेनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या दाव्याला दुजोरा दिला. सोशल मीडियावरील पोस्टमध्ये ट्रम्प यांनी इतिहासातील अत्यंत क्रूर व्यक्तींपैकी एकाचा अंत झाल्याचे म्हटले आहे. खामेनी यांचा मृत्यू हा केवळ इराणी जनतेसाठीच नव्हे, तर अमेरिकन नागरिकांसह जगभरातील पीडितांसाठी न्याय असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच इराणी जनतेसाठी हा देश पुन्हा हस्तगत करण्याची मोठी संधी असल्याचेही ट्रम्प यांनी म्हटले.

अयातुल्ला अली खामेनी यांनी १९८९ मध्ये अयातोल्ला रुहोल्ला खामेनी यांच्या निधनानंतर इराणच्या सर्वोच्च नेतेपदाची सूत्रे स्वीकारली होती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी इराणच्या राजकारणावर वर्चस्व राखले.

सर्वोच्च नेता म्हणून ते देशाचे सर्वोच्च धार्मिक आणि राजकीय प्राधिकरण होते. तसेच ते इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोअरचे कमांडर-इन-चीफही होते, ज्यामुळे त्यांच्या हाती प्रचंड अधिकार केंद्रित झाले होते. या दाव्यांनंतर मध्यपूर्वेतील तणाव अधिकच वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## एअर इंडियाची आणखी २२ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम आता आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीवर स्पष्टपणे दिसू लागला असून एअर इंडियाने रविवारी आणखी २२ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्याची घोषणा केली आहे. यामुळे या संकटाच्या पार्श्वभूमीवर रद्द करण्यात आलेल्या एअर इंडियाच्या परदेशी उड्डाणांची एकूण संख्या ५० वर पोहोचली आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्रांवर लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे १ मार्च रोजी भारतीय विमान कंपन्यांची सुमारे ४४४ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द होण्याची शक्यता आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव अनेक देशांनी हवाई मार्ग बंद किंवा मर्यादित केल्याने विमान कंपन्यांना नियोजित उड्डाण वेळापत्रकात मोठे बदल करावे लागत आहेत.

टाटा समूहाच्या मालकीच्या एअर इंडियाने निवेदनात म्हटले आहे की, मध्य पूर्वेतील वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीचे सातत्याने निरीक्षण आणि जोखीम मूल्यांकन केल्यानंतर कामकाजात अतिरिक्त कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्य असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

रविवारी रद्द करण्यात आलेल्या प्रमुख उड्डाणांमध्ये मुंबई–लंडन, दिल्ली–बर्मिंगहॅम, दिल्ली–ॲम्स्टरडॅम, दिल्ली–झ्युरिच, दिल्ली–मिलान, दिल्ली–व्हिएन्ना आणि बेंगळुरू–लंडन (हीथ्रो) या सेवांचा समावेश आहे.

याशिवाय दिल्ली–कोपनहेगन, दिल्ली–लंडन हीथ्रो आणि तसेच दिल्ली–फ्रँकफर्ट मार्गांवरील उड्डाणेही रद्द करण्यात आली आहेत. या संदर्भातील माहिती एअर इंडियाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिली.

## खामेनी यांच्या मृत्यूच्या वृत्तानंतर काश्मीरमध्ये निदर्शने

# श्रीनगरमध्ये शिया समाज रस्त्यावर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूच्या वृत्तानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसून आली. रविवारी श्रीनगरसह खोऱ्यातील अनेक भागांत शिया मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले असून इस्रायल आणि अमेरिकेविरोधात निदर्शने करण्यात आली.

श्रीनगरमधील ऐतिहासिक घंटाघर परिसरात मोठ्या प्रमाणावर निदर्शक जमले होते. आंदोलनकर्त्यांनी खामेनी यांचे फोटो, पोस्टर्स, इराणी झेंडे तसेच लाल, काळे आणि पिवळ्या रंगांचे बॅनर हातात घेत घोषणाबाजी केली. पुरुष आणि महिलांनी इस्लाम समर्थक तसेच अमेरिका व इस्रायलविरोधी घोषणा देत निषेध नोंदवला. वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले होते, मात्र परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने सांगितले. श्रीनगरसोबतच बडगाम आणि काश्मीर खोऱ्यातील इतर शिया बहुल भागांतही अशाच प्रकारची निदर्शने झाल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली. १९८० च्या दशकात श्रीनगरला भेट दिल्यामुळे अयातुल्ला खामेनी यांना काश्मीरमधील शिया समुदायामध्ये विशेष आदराचे स्थान असल्याचे मानले जाते. इराणी सरकारी माध्यमांनी हल्ल्यात खामेनी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील काही सदस्यांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त दिल्याने शोकभावना अधिक तीव्र झाल्याचे दिसून आले.

दरम्यान, जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी इराणमधील घडामोडींवर तीव्र चिंता व्यक्त करत राज्यातील सर्व समुदायांना शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केले. शोक व्यक्त करणाऱ्यांना शांततेत श्रद्धांजली अर्पण करण्याची संधी दिली जावी तसेच पोलिस आणि प्रशासनाने अत्यंत संयम बाळगावा, असे त्यांनी म्हटले आहे.

सरकार परराष्ट्र मंत्रालयाशी समन्वय साधून इराणमध्ये असलेल्या जम्मू-काश्मीरमधील विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## उष्णतेचा तडाखा तीव्र होण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कोरडा आणि तुलनेने उष्ण हिवाळा अनुभवल्यानंतर यंदाच्या उन्हाळ्यात देशातील बहुतांश भागात तीव्र उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. मध्य भारतातील काही भाग वगळता देशभर दिवस आणि रात्री दोन्ही वेळेस तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आयएमडीच्या अंदाजानुसार पूर्व आणि पूर्व-मध्य भारतातील अनेक राज्यांमध्ये तसेच आग्नेय द्वीपकल्प, वायव्य आणि पश्चिम-मध्य भारतातील काही भागात उष्णतेच्या लाटेचे दिवस नेहमीपेक्षा अधिक असतील. बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, पश्चिम महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये विशेषतः तीव्र उष्णतेचा परिणाम जाणवू शकतो. देशाच्या इतर भागांमध्ये साधारण ४ ते ६ दिवस उष्णतेच्या लाटेचा अनुभव येण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्या सुरू असलेले ला निना स्थितीतून तटस्थ हवामानाकडे होत असलेले संक्रमण हे यामागील प्रमुख कारण आहे. पुढील काळात ही परिस्थिती एल निनोकडे झुकण्याची शक्यता असून त्याचा मान्सूनवरही परिणाम होऊ शकतो. एल निनो परिस्थितीत प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील तापमान वाढते आणि त्यामुळे भारतातील मान्सून कमकुवत होण्याची शक्यता असते, तर ला निना स्थितीमध्ये याच्या उलट परिणाम दिसून येतात. आयएमडीने वाढत्या उष्णतेमुळे सार्वजनिक आरोग्य, जलसंपत्ती, वीज मागणी आणि अत्यावश्यक सेवांवर गंभीर ताण निर्माण होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. वृद्ध नागरिक, लहान मुले, बाहेर काम करणारे कामगार तसेच वैद्यकीय समस्या असलेल्या व्यक्तींना धोका निर्माण होऊ शकतो.

उष्णतेशी संबंधित आजार वाढण्याची शक्यता लक्षात घेता राज्य सरकारे आणि जिल्हा प्रशासनांनी पूर्वतयारी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. शीतकरण केंद्रांची उपलब्धता, पुरेशा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि आरोग्य यंत्रणेची तयारी मजबूत ठेवण्यावर भर देण्याचे निर्देश हवामान विभागाने दिले आहेत.

### ट्रकला धडकल्याने नवविवाहितांचा मृत्यू

**हावेरी (कर्नाटक) :** रविवारी सकाळी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर एका कारने पार्क केलेल्या लॉरीला धडक दिल्याने एका नवविवाहित जोडप्याचा जागीच मृत्यू झाला आणि इतर दोघे गंभीर जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले. कार्तिक (३४) आणि त्याची पत्नी ऐश्वर्या (३०) अशी मृतांची नावे आहेत. हे दोघे हवेरी शहरातील रहिवासी आहेत. त्यांचे लग्न १५ दिवसांपूर्वीच झाले होते. कडाहल्लीजवळ मंदिरातून दर्शन घेऊन परतत असताना त्यांची कार लॉरीला धडकून अपघात झाला.

## सारंडा जंगलात आयईडी स्फोट; असिस्टंट कमांडंट जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** झारखंडमधील पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात माओवाद्यांविरुद्ध सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान रविवारी आयईडी स्फोट घडवून आणण्यात आला. या स्फोटात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन (कोब्रा)चे असिस्टंट कमांडंट अजय मलिक जखमी झाले. काही तासांनंतर झालेल्या कारवाईदरम्यान गोळी लागून आणखी एक जवान जखमी झाला.

ही घटना सारंडा जंगलातील मारंगपोंगा परिसरात घडली. सुरक्षा दलांकडून जंगलात सघन कॉम्बिंग ऑपरेशन सुरू असताना आधीच पेरून ठेवलेल्या स्फोटकांचा स्फोट झाला. स्फोटात जखमी झालेल्या असिस्टंट कमांडंट मलिक यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी विमानाने रांची येथे नेण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

चाईबासा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमित रेणू यांनी सांगितले की, आयईडी स्फोटानंतर सुरू केलेल्या कारवाईदरम्यान गोळीबार झाला आणि त्यात कोब्रा बटालियनचा एक जवान जखमी झाला. त्यालाही उपचारासाठी रांची येथे हलवण्यात येत आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनी बंद होऊनही तात्काळ धोका नाही

# भारताकडे १० दिवसांचा कच्च्या तेलाचा राखीव साठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यानंतरही भारताला तात्काळ तेलपुरवठा संकटाचा सामना करावा लागणार नाही, अशी माहिती केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. देशाकडे किमान १० दिवसांच्या गरजा भागवण्यासाठी पुरेसा कच्च्या तेलाचा साठा असून अतिरिक्त ५ ते ७ दिवसांसाठी तयार इंधन साठाही उपलब्ध असल्याने अल्पकालीन काळात पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता कमी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.




इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या लष्करी कारवाईनंतर मध्यपूर्वेत तणाव तीव्र झाला आहे. या पार्श्वभूमीवर इराणच्या राज्य माध्यमांनी २८ फेब्रुवारी रोजी होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याची घोषणा केली. जागतिक तेल आणि वायू पुरवठ्यापैकी सुमारे पाचवा हिस्सा या मार्गातून वाहतूक केला जात असल्याने आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारात चिंता वाढली आहे. मात्र, हा व्यत्यय दीर्घकाळ टिकण्याची शक्यता कमी असल्याचा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या सुमारे ८८ टक्के गरजांसाठी आयातीवर अवलंबून आहे. दररोज आयात होणाऱ्या २.५ ते २.७ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलापैकी जवळपास ५० टक्के तेल होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत येथून येते. तसेच देशाच्या द्रवीभूत नैसर्गिक वायू (एलएनजी) आयातीपैकी सुमारे ६० टक्के आणि जवळपास संपूर्ण एलपीजी आयातही याच मार्गावर अवलंबून आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, भारतीय रिफायनरीजकडे टाक्यांमध्ये आणि वाहतुकीदरम्यान मिळून १० ते १५ दिवसांचा कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असतो. याशिवाय इंधन साठे देशाच्या ७ ते १० दिवसांच्या गरजा सहज पूर्ण करू शकतात. परिस्थिती दीर्घकाळ गंभीर राहिल्यास भारत आयात स्रोतांचे पुनर्मूल्यांकन करून रशिया, आफ्रिका, ब्राझील किंवा व्हेनेझुएला यांसारख्या पर्यायी पुरवठादारांकडून खरेदी वाढवू शकतो. मध्यपूर्वेतून भारतात तेल पोहोचण्यास साधारण पाच दिवस लागतात, तर रशियातून येणाऱ्या जहाजांना किमान एक महिना लागतो. त्यामुळे पुरवठा व्यवस्थापनासाठी आगाऊ नियोजन महत्त्वाचे ठरणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. आवश्यक असल्यास धोरणात्मक पेट्रोलियम साठ्यांचा वापर करण्याचाही पर्याय सरकारसमोर खुला आहे.

दरम्यान, सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवणाऱ्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड्स कॉर्प्सने जहाजांना इशारे दिले असले तरी अद्याप कोणत्याही जहाजावर थेट हल्ला झाल्याची नोंद नाही. विश्लेषकांच्या मते, दीर्घकालीन पूर्ण नाकाबंदीची शक्यता कमी असली तरी कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये अस्थिरता वाढण्याची शक्यता आहे.

ब्रेंट क्रूडचे दर या आठवड्यात सुमारे ७३ डॉलर प्रति बॅरलच्या सात महिन्यांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यास दर ८० डॉलर प्रति बॅरलपर्यंत जाऊ शकतात, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तज्ज्ञांच्या मते, सध्या भारतासाठी मोठा धोका प्रत्यक्ष टंचाईपेक्षा वाढत्या किमती आणि जागतिक आर्थिक परिणामांचा आहे.